# गीत-कुसुमांजली

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २२८७



REFBK-0021118
REFBK-0021118

: कवयित्री :
गोदावरी केशव राहाळकर

संदर्भ
काव्य
२१११८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

16 DEC 1976

# गीत-कुसुमांजली

: कवयित्री :

कै. श्रीमती गोदावरी केशव राहाळकर

REFBK-0021118
REFBK-0021118

एप्रिल १९७४ ]

[ किंमत ३ रुपये

प्रकाशक :

□ श्री. कृ. के. राहाळकर
टिळक रस्ता,
अलिबाग–कुलाबा

□ आवृत्ति पहिली

□ अक्षय्य तृतीया
२५ एप्रिल १९७४

□ किंमत ३ रुपये

□ सर्व हक्क प्रकाशकाधीन

□ मुद्रक :
ना. वि. पाटील
व्यवस्थापक,
सत्यसेवा मुद्रणालय, अलिबाग–कुलाबा

अर्पण-पत्रिका

आमच्या परमपूज्य प्रिय मातोश्री

## कै. ती. आनंदीबाई केशव राहाळकर

यांच्या

पवित्र स्मृतीस

सादर समर्पण

# गीत-कुसुमांजली, समालोचन

"गीत-कुसुमांजली" हा कै. श्रीमती गोदावरी राहाळकर यांचा कविता संग्रह, यांत कवयित्रीची, व्यक्ती-वर्णनात्मक, निसर्गवर्णनपर, देशभक्तीपर, बालगीते, भक्ती गीते अशा विविध प्रकारची काव्यें प्रासादिक भाषेत सहजतेने गुंफलेली आहेत. शारदास्तवन, "खरा होलिकोत्सव," 'मनोरमेस' (एका मासिकावरील चित्रास उद्देशून), ईशस्तवन इत्यादी विषयही समर्पकपणे, उत्कट भावनेच्या आविष्काराने प्रगट केले आहेत.

व्यक्तीवर्णनात्मक, देशभक्तीपर काव्यांतून भारतमातेच्या भवितव्याची चिंता व्यक्त झालेली आहे, काव्यद्वारा सुसंस्कार जागृती अपेक्षिलेली आहे. निसर्ग विषयक कवितांतून, निसर्गाचे चित्रमयी वर्णन रेखाटलेले आहे. अखेर कविता जीवन-विषयक चिंतनाकडे वळलेली दिसते. कविता-संग्रहांतील बालगीते वाचल्यावर आपणही बाल्य-जीवन अनुभवित आहोत असे वाटल्यावाचून रहात नाही. बालसृष्टीशी निगडीत असलेले असेच विषय बालगीतांचे असल्यामुळे, उपदेशाचे ओझे न वाटता त्यांतील काव्यानंदच योग्य तो परिणाम घडवू शकतो. कवयित्री शिक्षिका पेशांतीलच असल्यामुळे साहजिकच अशी काव्यरचना होऊ शकली.

थोडक्यांत असे म्हणणे योग्य ठरेल कीं हा काव्यसंग्रह विविध-विषय-समावेशक, सुगम, सुबोध, प्रासयुक्त भाषेने परीपूर्ण असा झाला आहे. त्याच्या वाचनाने वाचकाच्या मनाला आगळे समाधान लाभेल याविषयी खात्री वाटते.

— अरुंधती घारे

## कै. गोदावरी केशव राहाळकर

(ताई राहाळकर)



जन्म :
३०-१२-१९१३
के. माहीम,
जि. ठाणे

मृत्यू :
२०-११-१९७३
अलिबाग,
जि. कुलाबा

माझी भगिनी कै गोदावरी केशव राहाळकर हिचा हा छोटासा कविता-संग्रह "गीत कुसुमांजली" या नावाने प्रसिद्ध होत आहे. आम्हा दोघांचा कविता संग्रह 'संधि-प्रकाश' या नावाने प्रसिद्ध करण्याचा संकल्प, कौटुंबिक आपत्तिमुळे सिद्धीस जाण्याचा योग आला नाही. आता तिच्याच कवितांचा स्वतंत्र संग्रह प्रसिद्ध करीत आहे. तिच्या आजारीपणातच माझ्या मनात हा विचार आला व माझ्या काही मित्रांचेही तसेच म्हणणे पडले. तिच्या हयातींत तो प्रसिद्ध होऊ शकला नाही ही दुर्दैवी घटना आहे! तिचा मृत्यू काहीसा आकस्मिकपणेच झाला. कवितांची निवड तिच्या संमतीनेच झाली होती. तिच्या मृत्यूनंतरही काही हस्तलिखिते मिळाली. त्यांतील निवडक कविता या संग्रहात घेतल्या आहेतच.

लहानपणापासूनच, काव्य वाचन, पाठांतर, यांत तिला विशेष रस होता. शिक्षिका-जीवनात तिच्या वाट्याला मराठी विषय शिकविण्याचीच संधी मिळाली. १० वी, ११ वी या इयत्तांना तिने अनेक वर्षे (निवृत्त होईपर्यंत)

मराठी शिकविले. त्या व्यासंगामुळे तिच्या हातून साहजिकच विविध विषयांवर काव्यरचना झाली. शाळेतील समारंभ, स्नेहसंमेलने, अशा प्रसंगी ईशस्तवन, स्वागतपर पद्ये खूपच लिहिली गेली ! मैत्रिणींच्या, माजी विद्यार्थिनींच्या विवाहप्रसंगानिमित्त, मंगलाष्टके, पद्यात्मक अहेरही रचले गेले. अर्थात् तीं प्रसंगानुरूप असल्यामुळे त्यांचा समावेश या संग्रहात नाही. फक्त एका शिक्षक संमेलन प्रसंगीचे ईशस्तवन व स्वागतपर पद्य आणि काव्यात्मक अहेराचा एक नमुना या संग्रहात समाविष्ट केली आहेत.

यांतील काही कविता, मनोरमा, भारतकुमार वगैरे जुन्या काळच्या मासिकांतून आणि नंतर शाळेचे 'विकास' नियतकालिक, आदर्श मासिक आणि कुलाबा समाचार, राष्ट्रतेज इत्यादी साप्ताहिकांतून प्रसिद्ध झालेल्या आहेत. 'सुधाकरास' आणि 'चंद्रास' या एकाच विषयावरील कविता, रचनाभिन्नत्वाचा नमुना म्हणून संग्रहात घातल्या आहेत. विद्यार्थी दशेत लिहिलेल्या काही कविताही आहेत. अलिबागेतील महिलामंडळासाठी रचलेल्या काही धार्मिक पद्यरचनाही यात समाविष्ट आहेत.

कै. कर्मवीर कर्वे, मुलांचे प्रिय 'चाचा' पं. जवाहरलाल नेहरु, यांच्यावर अनुक्रमे २, ३ अशा कविता आहेत. विशिष्ट प्रसंगाने त्या लिहिल्या गेल्या आहेत. 'कर्मवीर कर्वे प्रशस्ति' ही कविता, महर्षींच्या जन्मशताब्दिपूर्ती दिनानिमित्त शाळेतर्फेच्या समारंभ प्रसंगी छापून वाटण्यात आली होती. (भगिनी ज्या शाळेत नोकरीस होती त्या "श्रीमती जानकीबाई हळदवणेकर कन्याशाळा" या शाळेचा नामकरण विधी, स्त्रीशिक्षणाचे पुरस्कर्ते आणि एस्. एन्. डी. टी. (कर्वे) विद्यापिठाचे संस्थापक महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे शुभहस्ते दि. १३ जून १९४५ रोजी झाला होता हे येथे नमूद करणे आवश्यक आहे.) भगिनीच्या कविता तिच्या विद्यार्थिनींना विशेष आवडायच्या.

अलिबागच्या हळदवणेकर कन्याशाळेच्या मुख्याध्यापिका, माननीया अरुंधती घारे, B. A. B. Ed. यांना विनंती करताच, त्यानी संग्रहांतील कवितांचे थोडक्यात पण सुंदर समालोचन लिहून दिल्याबद्दल (आणि तेही वार्षिक परीक्षांची घाई गडबड असतांनाही वेळ काढून) मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

आमचे एक चहाते मित्र आणि हितचिंतक श्री. कृ. भि. राऊळ यांच्या आपलेपणाच्या प्रयत्नाने हा संग्रह प्रसिद्ध करणे शक्य होत आहे. कवितांवर छापण्यासाठी छोटे ब्लॉक्स त्यांनी मुद्दाम तयार करून आणले. याबाबत श्री. अनंतराव ठाकूर यांनीही खटपट केली. त्यांचे आभार मानणे माझे कर्तव्य आहे. 'सत्यसेवा' मधील कर्मचाऱ्यांनीही संग्रह सुबकपणे छापून निघावा म्हणून खूप मेहनत घेतली. त्यांचाही मी आभारी आहे.

भगिनीच्या इच्छेप्रमाणे हा कवितासंग्रह पूज्य मातोश्रीस अर्पण करीत आहे.

भगिनीच्या वतीने ही "गीत कुसुमांजली" जनता-जनार्दनाचे हाती देत आहे. गोड मानून घ्यावी हीच नम्र प्रार्थना.

अक्षय्य तृतीया
दि. २५-४-७४
अलिबाग.

—कृ. के. राहाळकर

# गीतानुक्रम


| क्रमांक | | पृष्ठ |
|---|---|---|
| १) | शारदा-स्तवन | ७ |
| २) | स्वागत पद्य | ७ |
| ३) | बालांची कर्तव्ये | ८ |
| ४) | बालांची प्रार्थना | ९ |
| ५) | मनोरमेस | १० |
| ६) | बालिकेस | ११ |
| ७) | चंद्रास | १२ |
| ८) | सुधाकरास | १३ |
| ९) | मधु-मालती | १४ |
| १०) | खरा होलिकोत्सव ! | १५ |
| ११) | झांशीची स्वातंत्र्य-लक्ष्मी | १७ |
| १२) | वासल्य | १९ |
| १३) | जीवनोघ | २१ |
| १४) | कर्मवीर कर्वे पशस्ति | २३ |
| १५) | महर्षीस मानवंदना | २४ |
| १६) | वसंत ऋतु आला | २५ |
| १७) | शरदागम | २६ |
| १८) | लाल फुलांस पाहून | २७ |
| १९) | चाचा नेहरू चिरायुभव | २९ |

| | | |
|---|---|---|
| २०) | दिवंगत नेत्यास श्रद्धांजली ( पं. नेहरुस ) | ३१ |
| २१) | नेहरु चाचा स्मृति | ३३ |
| २२) | मनिषा | ३५ |
| २३) | लोकमान्यांच्या स्मृतीस | ३७ |
| २४) | हीच प्रतिज्ञा आमुची आज ! | ३८ |
| २५) | देशबंधू चित्तरंजन दास यांच्या स्मृतीस | ३९ |
| २६) | भारतीय नरनारी रत्ने | ४० |
| २७) | परीक्षा आणि पाखरे ! | ४१ |
| २८) | प्रियदर्शिनी इंदिरेस | ४२ |
| २९) | दृष्ट | ४४ |
| ३०) | भगवंत राजी | ४६ |
| ३१) | दत्ताचा पाळणा | ४७ |
| ३२) | विवाह मंगलप्रसंगीचा अहेर | ४९ |



## शारदा स्तवन

29996

देवता ज्ञानदा ऽऽ, वंदु श्री शारदा ॥ धृ ॥
गीत कुसुमांजली, पदयुगुली वाहुनी,
धवल वसनावृता, वंदु श्री शारदा ॥१॥

स्मित शोभे वदनावरी, विलसतही वीणा करी,
वरदायिनी शुभकारी, वंदु श्री शारदा ॥२॥
विद्यार्थी स्तविती नित, स्फूर्ति दे नव संतत,
होऊ या चरणी रत, वंदु श्री शारदा ॥३॥
जी विद्याबलदायिनी, सकल कलांची जननी,
वाहुनिया भावांजली, वंदु श्री शारदा ॥४॥

* * *

शिक्षक संमेलन समयीचे

## स्वागत पद्य

स्वागत सुमनी करु सकलांना,
विद्याव्रत अध्यापक सुजनां ॥ धृ ॥
स्वगृह मानुनी विद्यामंदिर, ज्ञानदान करितात निरंतर,
सेवाव्रत स्वीकारिती त्यांना ॥१॥
नव्या पिढीच्या मार्गदर्शनी, झटती मनोभावाने निशिदिनी
करिती देशसेवाच, त्यांना ॥२॥
भारतभूची ऋषीमुनींची, उज्वल ऐशा परंपरेची,
स्मृती ठेवुनी, वंदु त्यांना ॥३॥
विद्यार्थीजन सकल आजचे, भावी शिल्पकारच राष्ट्राचे
छात्रगणीं निर्मू अभिमाना ॥४॥

# बालांची कर्तव्यें

## (आर्या)

स्वामी जगत्त्रयाचा, सकलां आधार जो गणाधीश
तो राष्ट्रोद्धार करो, प्रणती करिते धरोनि मनि आस ॥१॥
देवी सरस्वती गे, वंदन करिते तुझ्या सु-पद-कमली
सद्बुद्धी दे मजसी, आचरण्यासी स्वकर्म पृथ्वितली ॥२॥
कर्तव्ये अवनीवरी, बालांची मी कथीन अल्पमती
त्यातें तत्पर राहुनि, आचरती त्यां मिळो सदा सुमती ॥३॥
कर्तव्य असे पहिले, उठता नमुनी करा प्रभु स्मरण
सृष्टीचा निर्माता ईश, करी सतत जो तिचे जतन. ॥४॥
कर्तव्य द्वितिय करा, निज मातेला सदैव द्या मान
गृह-कार्यी साह्य करा, सेवा त्या देवतेस तुलना न ॥५॥
"सुख व्हावे बालांते" इच्छा हृदयात बाळगी तात
वंदा, जो प्रेमाने सांभाळी, साम्य त्या न जगतात ॥६॥
तैसाच श्रेष्ठ असे, ज्ञानसुधा सेविता तुम्ही ज्याची
तद्वचन सुयश साचे, पदयुगुले आपुल्या नमा गुरुची ॥७॥
अध्ययनी रत व्हावे, एकाग्र मने तरीच यश पावे
यास्तव, मुदित मनाने जावे विद्यालयी, न चुकवावे ॥८॥
-निज राष्ट्र-मायभूमी, स्वतंत्र केली अमूप कष्टांनी
-जे राष्ट्रवीर त्यांचे, स्मरण करा धर्म रक्षिला ज्यांनी ॥९॥
दारिद्र्य-पंक-मग्ना, झाली पहा दीन हिंद-भू-माता
तीते उद्धाराया, नित्य झटा मानुनी तृण स्वहिता ॥१०॥


# बालांची प्रार्थना

तूच पिता, या जगता
सकलहि विश्वाचा त्राता,
रवि विलसे, किरण कसे
तव आज्ञेने वितरितसे, ॥१॥

गडगडती, मेघतती
वीज लकाके सोज्वल ती,
नभातले, ग्रह सगळे,
तारे चमकती तेजबळे, ॥२॥

जलधि मही, खग पशुही
नरनारी सगळे काही,
तरूलता, नगसरिता,
तूच चराचर निर्माता, ॥३॥

तव महिमा, बालमना
न वर्णवे, वंदित चरणा
प्रभो तुला, विनती सदा
गुंगो मम मति तुझ्या पदा ॥४॥



# मनोरमेस

(बऱ्याच वर्षांपूर्वी ' मनोरमा ' नावाचे एक सुंदर मासिक प्रसिद्ध होत असे. त्याच्या एका अंकावरील चित्रास पाहून सुचलेले विचार – )

तुझीच वाट पहात मनोरमे,
झडकरी चल ये तव वाङसुमे
अमित मोहक शोभत ती अहा
विखरतात सुगंध कसा पहा.

विकसलीं कसली नलिनी सुमें
विविध लेखक-लेखन ते गमे,
त्वरित ये बहु उत्सुकता जना
खुलवितात तुझ्या कविता मना.

करित स्वागत हास्यमुखे सती
प्रगटली जणु देवी सरस्वती
मधुयुता मुदशा मुकुलापरी
रमविते तव वाङमय माधुरी.

प्रभु सदा तुज साह्य सुहासिनी
करिल गे तव वाङमय सेवनी.

# बालिकेस

(दीड-दोन वर्षांची लहान बाला आपल्या बालिश लीलांनी सगळ्यांना रंजविते. ह्या तिच्या लीला अक्षयी टिकाव्यात असे कोणास वाटणार नाही ?)

(चाल :- मम बंधु सखा...)

हास गडे तू रुचिरे, हास सदा तू
धरि ना मनि किंतू ।
मधु हास्य खळी गालि तुझ्या नित्य पडू दे
चिर सौख्य बहरू दे।
कोमल सुम-कलिकेपरि जणु दंत दिसावे
प्रमुदित जन व्हावे ।
मृदु चरणीं सतत तुझ्या नृत्य करावे
गृही सुख विहरावे ।
स्फुट अस्फुट वा बोल मुखीं दिव्य वसू दे
तुज हृदयि धरू दे ।
तव लीलेने मोहक भू स्वर्ग बनावी
आनंदि डुलावी ।
परमेशा, आशा मम, सफल करावी
'ही दीर्घायुषि व्हावी.' ॥

# चंद्रास

(चाल : सुकुमार असुनी तू...)

साम्राज्य भानु अस्तास जात सकलांस देउनि त्रास ।
करि शांत सुधांशो सुधासिंचने भूस ।। १ ।।
सुविनाश पातला खास, याचि समयास आर्य जनतेस ।
परदास्य राहु बहु त्रस्त करी देशास ।। २ ।।
गांजली, विद्ध जाहली दास्य कज्जली पहा भू–माय ।
सुखवि रे सुधामय कोमल किरणि तियेस ।। ३ ।।
परदास्य तिमिर घनघोर, नेत्री जलपूर दूर करि त्यास ।
उगवुनिया चंद्रा फेकुनि कर–तीरांस ।। ४ ।।
अज्ञान, वृथा अभिमान, मान अपमान, होउ दे नष्ट ।
करि स्वाभिमानि, सज्ञानि आर्य जनतेस ।। ५ ।।
स्वातंत्र्य चांदणी रात्र, परम सुपवित्र भोगण्या पात्र ।
भो तिमिर रिपो, करि दास्यमुक्त राष्ट्रास ।। ६ ।।

# सुधाकरास

( सुकुमार असुनी तू फार..... )

जगतास
देऊनी त्रास, भानु अस्तास
हा जात शांतवी सुधा-सिंचनी भूस ॥ १ ॥

त्रासल्या
शुष्क जाहल्या, लता बघ सगळ्या
डवरु दे सुधामय कोमल किरणी त्यांला ॥ २ ॥

हा तिमिर
भरे घनघोर, करी त्या दूर
ये उदया चंद्रा फेकी तव कर-तीर ॥ ३ ॥

अज्ञान
वृथा अभिमान, होऊ दे नष्ट
सज्ञान देश-अभिमानी होवो राष्ट्र ॥ ४ ॥

स्वातंत्र्य
सुखद सुपवित्र, -चांदणी रात्र-
उगवण्या असे ही भारतभूमी पात्र ॥ ५ ॥

# मधु–मालती

( मधु–मालती–पुष्पें रात्री फुलतात, त्यावेळी ती शुभ्र असतात व त्यांना उत्तम मंद सुवास येतो. सूर्योदयानंतर एक दीड तासांनी ती तांबडी, वासरहीत होतात.... ...)

(सुनीत)

पुष्पांनो मधुमालती, लवकरी कोमेजता का तुम्ही ?
येऊनी उदयास भास्कर घटी ना चारही लोटती.
येथे गंध मरंद जो विखुरला, चित्तात धालो किती,
पाहोनी तुमचे स्वरूप नयनां आल्हाद होतो अती !
चाले सूर्य हळूहळू नभपथी माध्यान्ह ती होईल,
अस्ताद्रीवर भानु जाइ तवरी थांबाच थांबा जरा.
चंडांशु रविराज प्रार्थु, किरणां त्यां दूर तो नेईल,
थांबा तोवर, काही बोलत बसू, सद्बोध आम्हा करा.
"केव्हा येईल काल ? नश्वर जगा सोडून जाऊ कधी ?
कोणाला न कळेच," मंजु उठती हे शब्द कुंजामधी,
"आहे जीवित आमुचे क्षणिक हे ध्यानात ठेवू सदा,
होवो सद्व्यय मानसी धरितसो इच्छा भिऊ ना कदा."

ऐसे बोलुनि बोल जाहलि सुमे ती रक्तवर्णांकित !
झाला नष्ट सुवास, रंग विरला, कोमेजली भासत !!

# खरा होलिकोत्सव !

(दारूच्या धुंदीने कुटुंबहितास पारखा होऊन घर सोडून गेलेला, परंतु सरकारी दारुबंदीचे कार्यक्रम पाहून मन ताळ्यावर आलेला, असा दारुबाज नवरा, होळीच्या सणाला, दारू सोडल्याची शपथ घेऊन घरी येतो व आपल्या बायको–मुलांत रममाण होऊ पहातो.)

(**चाल** : केशवकरणी)


खेड्यातील त्या वातावरणी रम्य दृश्य पाहिले ।
नेत्रीं मोदाश्रू चमकले ।। धृ ।।
मदिरेच्या धुंदीत चालला संसारा सोडुनी
परतवी एक जादुगारिणी
पश्चातापे दग्ध होऊनी धनी परतला घरा
होळीचा सण झाला साजरा.
ती सान बालकें येवोनी बिलगती,
मातेसी आपुल्या आनंदे सांगती,
' ते आले बघ चल, भांबावसी तू किती ? '
आनंदाने गहिवरलेल्या कोमल कंठांतुनी
अस्फुट मधुर शब्द उमटती ।। १ ।।
पिता घेऊनि बाळें जवळी गोंजारी त्यांजला
म्हणे, रे, निज हित कळले मला.
मुलीस म्हणतो, – बैस अशी तू माझ्या जवळी जरा
सांगतो विचार करुनी पुरा
जी कृति माझी ती तुम्हाला जाचली,
बघ आजपासुनी शपथ हीच घेतली,
जगी निंद्य अशी ती दारू मी सोडिली,

धन्य जाहलों, आजपासुनी फेकियली मोहिनी,
जिने मज भ्रष्टविले वंचुनी ॥ २ ॥

दारू पिऊनी घरा येऊनी, लाजविले मी तुम्हा,
मजला आता करा गे क्षमा,
सखे साजणी, रुसू नको गे शब्द एक बोल ना
आजवरी केली मी वंचना !

ती कठोर करणी आठवते गे मला,
बेगुमान झालो, छळिले मी लेकरां,
ती आज जाहली जाणिव मम अंतरा,

शुद्ध बुद्धीने शपथ घेऊनी दारू बघ सोडिली,
मोहिनी प्रमत्त ती जाळिली ॥ ३ ॥



# झांशीची स्वातंत्र्य-लक्ष्मी

( चाल : राजहंस माझा निजला ..... )



देशास्तव दिधले प्राण, स्वातंत्र्य-संगरी ज्यांनी,
त्या हुतात्म्यांस प्रेमाने, श्रद्धांजली अर्पू स्मरुनी
हिंदचे सुपुत्र, सुकन्या, प्रणिपात तयांना करुनी.
गाजली खरी शौर्यखनी,
झांशीची लक्ष्मी राणी,
देणार न झांशी म्हणुनी
इंग्रजांस गर्जुनी सांगे, उतरली रणी मर्दानी ॥ १॥

या भारतभूमीवरती, परक्यांची सत्ता आली,
ना भिणार आम्ही त्यांना, पाशवी किती जरी असली
धर्माने भिन्नहि असलो, एक होऊ संकट काली.
' डरणार न कर्दनकाळा,
पाजून पाणी गोऱ्याला
उखडून टाकू सत्तेला,'
गर्जली गमे जणू काली, झांशीची पालनवाली ॥ २॥

सैनिकांस जमवी अपुल्या, उत्तेजन त्या देवोनी,
पेशव्यांस अन् इतरांना, योग्य मार्गदर्शन करुनी,
समरात उतरण्या सजली, रणशूर धीर ही रमणी.
वय सान तरी दावियला
विक्रम जो दिपवी अरिला,
हिंदकन्यका नच अबला,
आंग्लांना दावी कृतीनी, झांशीची लक्ष्मी राणी ॥ ३॥

ही भारतभूमी अमुची, अन्याये का आक्रमिता ?
धर्म-देश प्रिय आम्हांते, परधर्म गाजवी सत्ता !
प्रतिकार करू जुलमाचा, परक्यांना देऊ लत्ता,
परसत्ता सहन न करणे
स्वातंत्र्यास्तव हे लढणे
मृत्युभया ना मनी धरणे,
जाणीव ठेउनी हृदयी, रणरागिणी झाली राणी ॥४॥
वीरश्री चढली अंगी, समरांगणी सजुनी आली
भरधाव फेकिता घोडा, शत्रूची नजर न ठरली
नग्न खड्ग तळपे हाती, राणी जणू गमली बिजली,
कडकडली, विरुनी गेली,
परसत्तावाते विझली,
शौर्यदीप ज्योत अकाली !
मरुनीही अमरच झाली, भारताचि लक्ष्मी राणी ॥ ५ ॥



# वात्सल्य

(मोठी माणसे जीवनांत जी काही धडपड करतात, तीं पुष्कळशी मुलांसाठीच असते. ही चिमणी पाखरे सुद्धा पहा कोणासाठी राबतात ती–)

तुळईच्या कपारीत, छोटे घरटे सुंदर,
चिमणा–चिमणीचा, राजा–राणीचा संसार ॥

कष्ट करोनी बांधिले, धाग्याधाग्यांनी गुंफिले,
उबदार कापसाने, घरकूल शोभविले ॥

मऊमऊसा बिछाना, बाळांसाठी बनविला,
भूक लागता खायाला, दाणादाणा साठविला ॥

घेई भरारी चिमणी, चोचीतून आणी दाणे,
चिमणाही खाऊ घाली, प्रेमभरे बाळा खाणे ॥

आळीपाळीने दोघेही, आत ये–जा करिताती,
पिलांसाठी प्रेमभरे, घरट्यात घोटाळती ॥

'चिव चिव' या शब्दांनी, एकमेकांत बोलती,
अवतीभवतीचे जग, सारे काही विसरती ॥

हितगुज हे एवढे, करितात कुणासाठी ?
रात्रंदिन राबताती, आपुल्या त्या पिलांसाठी ॥

" पिलांवाचून कुणाला घरकूल बांधायाचे ?
पिलांसाठीच आम्हांला, जगात या जगायचे ॥

पिले मोठी झाल्यावर, जाती उडोनी बाहेर,
बांधितील स्वतःसाठी, छोटसेच घरकूल," ॥

ऐसे सांगोनी आपणां, उडती भरारी घेऊन,
दाणे चोचींत घेऊन, पुन्हा येती परतून. ॥



# जीवनौघ

(तीनविरा धरणाच्या परिसरात...)

सान थोर त्या सर्व कन्यका एकत्रित जमल्या
मुदितमने वनविहार करण्या गणवेषे सजल्या ।
सुरम्य एका प्रभातकाळी वाहनात बसल्या
हर्षभराने प्रसन्न हृदयें गान गाऊ लागल्या ।
यंत्र युगातील वाहन मग ते मार्ग क्रमू लागले
इष्ट स्थळी त्यां नेउनी मग ते माघारी फिरले ।
विहगवृंद जणु थव्याथव्याने गगनी उंच उडे
निळ्या पांढऱ्या वेषांमधि हा बालागण बागडे ।
निसर्गनिर्मित अपूर्व शोभा बघण्या मग धावती
कसले बंधन ? कुठली भीती मनी न बाळगिती !
फिरता फिरता नीट ओहळाजवळी मग जमती
ज्ञानपिपासू कुशाग्रबुद्धी तयि जागृत होती ।
असे काय ते ? कशास ते ? का ? असल्या प्रश्नांनी
कुतुहल मनिचे स्पष्ट करीती अत्युत्सुक होउनी ।
अवलोकुनिया सारे श्रमल्या, बसल्या छायेत
डबे उघडुनी विविध तऱ्हेच्या उपहारा घेत ।
गप्पा, गोष्टी, गाणी, नकला करिती स्वच्छंदे
बहुविध विषयी रंगुनी जाती क्रीडति आमोदे ।
क्षुधा भागली, तृषा निमाली, नव उत्साहाने
पशुपक्षी पाहाण्या धावती किति उत्सुकतेने ।
मार्ग क्रमूनी जलाशयाच्या समीप त्या येती
तिथेच रमती दृश्य चित्र ते चित्रित त्या करिती ।



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे 2207

बसुनी त्यांच्या सन्निध मीही त्यांच्यांतच रमले
शब्दचित्रही रेखाटाया विचारही स्फुरले ।
अवती भवती जलाशयाच्या मानस स्थिर झाले
भविष्यातले आशादायी चित्र उभे राहिले ।
निसर्ग सुंदर स्थळी निर्मुनी जलसंचय आज
नव्या जगातिल मानव करितो किमयेचे काज ।
सुसज्ज साधन संपत्तीने नवरचना करुनी
अवखळ पळत्या जलप्रवाहा बंधन घालोनी ।
तृषित जिवांची तृषा भागण्या जीवन पुरवील
आसमंतातिल भूभी सुजलाम् सुफलाम् होईल ।
एकच आशा धरून सोशी घाव घणाचे ही
उज्वल उन्नत भविष्यकाळाकडे दृष्टि राही ।
निसर्गसन्निध मानवनिर्मित भव्य सरोवर नवे
राहील उभे रमवित मानव जीवन-लहरीं-रवे ।



# कर्मवीर कर्वे प्रशस्ति



नव्या मनूच्या नव–महिलांनो,
नव स्फूर्तिने पुढे चला
मानवंदना, भारतरत्ना महर्षीस
देण्यास चला ॥ घृ ॥
माय भगिनिंना उद्धाराया
रात्रंदिन कष्टला स्वये
रूढी–बंधनें, दास्यशृंखला
अबलांच्या तोडिल्या तये.
अवती भवती दुष्ट रूढींची आग पेटली नित्याची,
विझवायाचा विडा उचलला अमोल ईर्षा हृदयाची.
गीतेमधला कर्ममार्ग आचरण्याला अवतरला
कर्मवीर जाहला कृतीने, मंत्रही इतरां शिकवियला.
असंख्य भारतललना होत्या रूढी–पंकी रुतलेल्या,
स्वतंत्र जीवन नसे तयांना गुलामापरी बनलेल्या !
स्थिती तयांची केविलवाणी कुणी न त्राता असे तयां,
मार्ग दाविण्या सिद्ध जाहला कष्ट अपरिमित साहुनिया.
आत्मोन्नतिचा अमोल पथ दाखविला हिंदू अबलांना,
ज्ञानामृत पाजूनी बनविले सबला, दलिता पतितांना.
अबलोन्नतीचे रोप लाविले महिलाश्रम स्थापन करुनी,
विद्यापीठ हा वृक्ष वाढला फळा-फुलांनी बहरोनी.
स्वराष्ट्रसेवा त्यागबलाने, विद्यादानाने केली,
रत्नासम चमकला भारती, पदवी सार्थच ती झाली.
'हिंदसुपुत्रा दीर्घायू कर' ही प्रणती प्रभूचरणांला
जन्म–शताब्दि–पूर्ति दिनाच्या करु मंगल शुभसमयाला.
नव्या मनूच्या नव–महिलांनो, नवस्फूर्तिने पुढे चला,
मानवंदना, भारतरत्ना महर्षीस देण्यास चला ॥

## महर्षींस मानवंदना

'महर्षि कर्वे स्वर्गी गेले' वार्ता जव ऐकिली,
जनमनें शोके हेलावली।
भारत महिला दास्य-पंजरीं, होत्या पडलेल्या
रूढीच्या गुलाम बनलेल्या।
तो गीतेमधला, कर्ममार्ग पाळुनी,
सत्कर्म करोनी, कर्मयोगी होउनी,
महामंत्र तोच इतरांनाही शिकवुनी,
परावलंबन वणवा भवती भयद असे भडकला,
विझविण्या रात्रंदिन राबला॥ १ ॥
हिंदु स्त्रीप्रत आत्मोन्नतिचा अचुक पंथ दाविला,
स्वावलंबन-किरणीं उजळला,
उद्धरिली ती हतबल अबला, त्राता कुणी नच जिला
बनविली सबला ती आजला.
जे अबलोन्नतिचे रोप तये रोविले,
आश्रमी पोसले, ज्ञानजळे शिंपिले,
ते विद्यापीठी, वृक्षासम वाढले,
भव्य वृक्ष तो फळाफुलांनी आज खरा बहरला,
चिरंतन कीर्तिरुपें राहिला ॥ २ ॥
स्वराष्ट्रसेवा, विद्यादाने, त्यागाने साधली,
'भारत रत्न' पदवी लाभली.
श्रमसाफल्ये धन्य होऊनीं शतायुषी शोभला,
कृतीने रत्नासम चमकला.
भारतीय महिला नित्य स्मृति ठेविल,
हिंदभू-सुपुत्रा श्रद्धांजलि वाहिल
देण्यास मानवंदना शीर नमविल,
कर्मभूमीतच पवित्र आपुला देह तये ठेविता
साधली जीवनाचि पूर्णता ॥ ३ ॥

# वसंत ऋतु आला

वसंत ऋतु आला आला, वसंत ऋतु आला,
सजवायासी भूमातेला वसंत ऋतु आला ॥ धृ ॥

वृक्षगणा नव पल्लव फुटले
पर्णस्खलन ते आता संपले,
आम्रतरूला मोहर आला,
वसंत ऋतु आला ॥ १ ॥

आम्रस्वादा मनी आतुरला
कोकिल कूजनी रंगू लागला,
कवि रसिकांना स्फूर्ती द्याया
वसंत ऋतु आला ॥ २ ॥

वृक्ष बहरले फळा-फुलांनी
मनुज तोषला रुची-वासांनी,
सूर्यातपही सह्य भासला,
वसंत ऋतु आला ॥ ३ ॥

सृष्टिसती सौंदर्ये सजली
सुवर्ण वस्त्रांनी जणु नटली,
या सृष्टीला भूषवावया
वसंत ऋतु आला ॥ ४ ॥

निसर्गदेवी चला पुजू या
वसंतपूजा-ऋचा गाऊ या,
आशीर्वच मागू, प्रार्थू या,
वसंत ऋतु आला ॥ ५ ॥

# शरदागम

शरद् अहा आला, अनुपम शोभा देत सृष्टीला ।। धृ ।।

निर्माया जगी आमोदाला, शरद् ऋतु आला,
वसुंधरेला सुखवायाला स्वयेंच बहुरंगी हा नटला.
शरदागम होताच भूवरी विविध सौंदर्ये नटते ती
वसुंधरेची धन-दौलत जणु विखरुनी दे जगतावरती.
सुखवित सकला चराचराला, शरद् अहा आला ।। १ ।।

पारिजात बहरला दारचा, सडा पडे अंगणीं फुलांचा,
कोमल सुमने सु-मने वेधिती, मंद सुवासही पसरे त्यांचा.
धवलत्वाने जनांस देती, संदेश सदा मांगल्याचा,
रंगही भगवा त्या देठांचा भाव उपजवी मनीं त्यागाचा,
विजयाने ललकारित आला, शरद् अहा आला ।। २ ।।

फुले असंख्यही अवनीवरती, रम्य तडागी कमले फुलती,
धान्य-धनांनी पूजा बांधिती, विभवे नटली वनदेवी ती,
वृक्ष-वेलींची अमोल संपदा, फुले, फळे आली बहराला,
समृद्धिचा श्रृंगारसाज हा अर्पायासी भूमातेला
आनंदाने नाचत आला, शरद् अहा आला ।। ३ ।।

शरदातील ते निसर्ग-वैभव उपभोगाया मानव दुबळा,
प्रयत्न करतो विफलची ठरतो, वेळ न पुरतो आज तयाला !
यंत्रयुगे कैचीत पकडले, वेळ पारखा तयास झाला
सुन्न मनाच्या अशा मानवा, वातावरणे रमविल त्याला.
करील स्वागत शरद ऋतुला, शरद् अहा आला,
शरद् अहा आला, अनुपम शोभा देत सृष्टीला ।। ४ ।।

## लाल फुलांस पाहून –

(एका विशिष्ट वेलीवरली ही लाल फुलें फुलल्यावर सुंदर दिसतातच, कोमेजली तरी रंगहीन होत नाहीत, वेलीपासून दूर झाल्यावर ती वाऱ्याबरोबर भिरभिरतात, तेव्हाही मोहकच दिसतात ! ही कोणती लाल फुलें ते तुम्हास ओळखता येते का पहा बरे ? त्या फुलांस पाहून –)

लाल फुलांचे गुच्छ मनोहर वायुसवे हलती,
वेलीवरही इकडून तिकडे स्वच्छंदे डुलती.

जनां सुखविती नयन मनोहर रंगाते दाउनी,
हितगुज करती पानांच्या जणु कानांशी लागुनी !

काही काळ हे असेच चाले स्वच्छंदे डोलणे,
कालगतीने प्राप्त परी त्या वेलीला सोडणे !

वेलीपासुनी जाती सुटुनी, भरकन् भिरभिरती
खाली पडती, खंत ना मनी आनंदी वृत्ती !

" वेलीवरूनी दूर जाहलो," याची त्यां न क्षिती,
कालकृती ही तया कळेना, दुःख न त्यां चित्ती !

सुकुनी जाती भूमीवरती होईना पोषण,
रंग लाभला रम्य हेच त्यां भाग्याचे भूषण.

मोहक त्यांचा लाल रंग किती जनमन खुलवीती,
सान बालिका हाती घेऊनी हृदयाशी धरिती.

कुणी खोविते केशपाशी त्या सहज प्रवृत्तीने,
कुणी हुंगिती वास त्या न जरी तरीही प्रेमाने.

सृष्टीच्या प्रांगणात पडते रास फुलांची ती,
गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या तीं वाऱ्यासह खेळती.
पाठशिवणीचा खेळ चालतो जणु वाऱ्यासंगे,
दृश्य पाहुनी कवी मनाला ओढ नवी लागे.
विषय लाभला काव्य कराया, पद्य-पंक्ति स्फुरती
टिपुनी घेण्या सुखद क्षणा हृदयोर्मी हेलावती !





# चाचा नेहरु चिरायु भव

( भारतीय जनतेचा आवडता नेता, राष्ट्राचा कंठमणी, भारतभूचा लाडका सुपुत्र, नररत्नांतील जवाहीर, बालांचा "नेहरू चाचा", यांच्या चौऱ्याहत्तराव्या वाढदिवसानिमित्त सादर अभिवादन- )

राष्ट्राचा मुकुटमणी तू जवाहिरा
सेनानी धैर्यशाली तू धुरंधरा,
भक्तियुक्त काव्यसुमें अर्पिते तुला,
विनती प्रभुपदी शतायु लाभण्या तुला.
भारतभू वीरप्रसू जगती गाजली,
कूस तिची तव कृतिने धन्य जाहली.
भूषविती तुजसम सत्पुत्र ते तिला,
राष्ट्राचा मुकुटमणी तू जवाहिरा ॥ १ ॥

आजवरी स्वातंत्र्या तूच रक्षिले,
पंचशील योजनेशी त्वां आरंभिलें.
आक्रमिला शांतीचा मार्ग जेधवा,
बंधुभाव हृदयीचा दाविला तुवा.
वंचियले जरी तुजसी भय नसे तुला,
उपयोजिसि क्रान्तीचा मार्ग तो भला.
आक्रमिशी यश-पथासी पथिक तू खरा,
राष्ट्राचा मुकुटमणी तू जवाहिरा ॥ २ ॥

'शठं प्रति शाठ्यं' हे तत्त्व मानिसी,
सीमेवरी राष्ट्राच्या लक्ष ठेविसी,
वैऱ्याला हटविण्यास करिसी योजना,
राष्ट्राच्या रक्षणार्थ करिसी घोषणा,

राष्ट्राला हाक दिली जेधवा तुवा,
भारतीय जनतेने सांधला दुवा,
भेदभाव विसरुनिया हाक ऐकिली,
देशबांधवांनी तुझ्या साद ही दिली ॥३॥

एकमुखे भारतीय वीर-चमू तुला,
आश्वासन देउनिया सज्ज जाहला,
तनमनधन अर्पुनिया मायभूमिला
रणांगणी लढण्यास्तव सिद्ध जाहला.

राष्ट्राचा नेता तू थोर आजला,
लाभो 'दीर्घायु' तुला, प्रणति प्रभूला.
शतायुषी व्हावे त्वां आस ही मनी,
प्रार्थित मी प्रभूपदासि नम्र होउनी ॥४॥

## दिवंगत नेत्यास श्रद्धांजली (पं. नेहरुंस)

प्रिय भरतभूवरी या, दैवे आघात केला,
निर्घृण काळपुरुषे, नेले जवाहराला ॥ धृ ॥

साधून क्रूर वेळा, घाला अचूक आला,
हतभाग्य भारताला, त्राता कुणी न उरला !
तो धैर्यमेरू आमुचा, आधार नष्ट झाला,
निर्घृण काळपुरुषे, नेले जवाहराला ॥ १ ॥

खाणीत भारताच्या, असती अमोल रत्ने,
होती, आहेत, पुढती दिसतील ती प्रयत्ने.
पंडीत रत्न होते, भूषाच भारताला,
निर्घृण काळपुरुषे, नेले जवाहराला ॥ २ ॥

ते रत्न धवलतेने, उजळी प्रथा यशाची,
तो कोहिनूर लाजे, ऐकून कीर्ती ज्याची !
त्या तेज-दिव्यतेने, दिपवीयले जगाला,
निर्घृण काळपुरुषे, नेले जवाहराला ॥ ३ ॥


सत्पुत्र भारताचा, सन्मित्रही जगाचा,
संदेश शांततेचा, जगतास नित्य दिधला,
तो शांतीदूत झाला, आदर्श भारताला,
निर्घृण काळपुरुषे, नेले जवाहराला ॥ ४ ॥

जनता-जनार्दनाच्या सेवेत मग्न झाला,
स्वातंत्र्य युद्ध लढता, कारागृहात गेला,
तो राजयोगी आचरी सेवाव्रता-तपाला,
निर्घृण काळपुरुषे, नेले जवाहराला ॥ ५ ॥

अनमोल कार्य केले, पंतप्रधान झाला,
भोक्ता असे फुलांचा, 'चाचा' असे मुलांचा,
सर्वांवरी रुसोनी, स्वर्गी निघूनी गेला ?
निर्घृण काळपुरुषे, नेले जवाहराला ॥ ६ ॥

करी धन्य मायभूला, जगतात वंद्य ठरला,
जरी देह नष्ट होई, आत्मा विदेही झाला,
भूमीत भारताच्या, परमाणुनी मिसळला,
निर्घृण काळपुरुषे, नेले जवाहराला ॥ ७ ॥

ते रम्य रूप आठवे, नेत्रांत अश्रू येती,
त्याच्या स्मृतीस भावे शीर्षे विनम्र होती.
काव्यांजली तयाच्या अर्पीत ही पदाला,
निर्घृण काळपुरुषे, नेले जवाहराला ॥ ८ ॥



# नेहरू चाचा स्मृति

( दिनांक १४ नोव्हेंबर हा नेहरूंचा जन्मदिवस. दरसाल तो सर्व भारतभर बालदिन म्हणून साजरा केला जाईल; पण या बालदिनाच्या समारंभास ( १४ नोव्हेंबर १९६४ ) बालांचे आवडते 'नेहरू चाचा' नाहीत ! तरी त्यांचे अस्तित्व तर जाणवत आहे ! कसे ते पहा –)

'नेहरू चाचा' आमुचे,
आज आम्हांमधि नाहीत !
बालगणांच्या मनामनांतुनी
वसती करुनी आहेत. १

'नेहरू चाचा' आमुचे,
आज जरी ते नाहीत !
गुलाब पुष्पांच्या मधुनी ते
लपुनी बसले आहेत. २

'नेहरू चाचा' आमुचे,
आज आम्हांमधि नाहीत,
भारतियांच्या मनोमंदिरी,
भरुनी उरले आहेत. ३

'नेहरू चाचा' आमुचे
आज आम्हांमधि नाहीत,
पांचही खंडामधुनी अजुनी
कीर्ति गुणाने आहेत. ४

'नेहरू चाचा' आमुचे,
आज जरो ते नाहीत,

मासिकांतल्या पानांमधुनी
रोज तुम्हाला दिसतात. ५

' नेहरू चाचा ' आमुचे,
आता दिवंगत झालेत !
भारतीय भूमिवरी आमुच्या.
अणुरेणूमधि आहेत. ६

' नेहरू चाचा ' आमुचे,
आज आम्हांमधि नाहीत,
प्रतिमेमधुनी पहा कसे ते
आमुच्याकडे पाहतात ? ७

' नेहरू चाचा ' आमुचे,
आज जरी ते नाहीत,
आशीर्वच देण्यास आम्हांला,
स्वर्गी बसले आहेत. ८

' नेहरू चाचा ' आमुचे,
आता इथे जरी नाहीत,
' पंडीत नेहरू अमर है ' अशा
घोषणेत ते आहेत ! ९

# मानिषा

वर्षर्तूपासून शरदापर्यंत,
बहरोनी फुलझाडे पहा डोलतात,
गुलाब, जाई, जुई, पारिजात,
वृक्ष वल्लरींना शोभा आणितात.
अखंड फुलणारी फुल्ल सदाफुली,
तशाच पांढऱ्या शुभ्र या तगरी,
भगवी, गोंडेरी, ही तर पांढरी,
जास्वंद एकेरी तशीच कातरी ॥
लाल, पांढऱ्या, एकेरी, दुहेरी,
विविध जातीच्या शोभती कण्हेरी,
गोकर्ण, धोतरा, झेंडू, कर्णफुले,
गुलमोहर पाहूनी कवीमन भुले.
नसू दे सुगंध असंख्य फुलांना
प्रभू पूजनाचा मान हा तयांना.
ऋतु कालोद्भव पुष्पांनी पुजावे,
प्रभूच्या भक्तीशी हेच हो मानवे ॥
सुगंधे सुखविती चंपक, केतकी,
सोनटक्का, बकुळ, मोगरी, शेवंती.
परी नाही ज्यांस मोहक सुवास,
अशी पुष्पेही जनमानसास
वेड लाविताती, भुरळ घालिती
आबालवृद्धांना ती संतोषवीती.
सुजनहो, पहा कोणती फुले ती,
तीन दिवसांत रंग दाविताती ? ॥

छोट्याशा घराच्या छोट्या अंगणात,
गुलबक्षी फुलती पहा असंख्यात,
विविध रंगांनी मुदे डोलतात
बाल-सुमनांना मोहवितात,
जरी नसे सुगंध, परी शोभिवंत,
बघुनी खुड्याया बाला ये धावत !
सांगते सख्यांना "या ग या खुडाया,
गुंफुनी माळा केसांत घालू या." ॥
सुन्दर रंगाची तेरड्याची फुले,
ओंजळ भरूनी घेतली ती पुढे,
ओविली तियेने मग छान माळ,
केसांत गुंफुनी म्हणते खट्याळ,
"दिसते सुंदर सांगाना मी कशी ?
स्वर्गातून आले परीच हो जशी."
सारी सुपुष्पे ती हासून वदली,
"जीवनें आमची सार्थकी लागली ॥
मनात आमच्या सुखवावे जनांस,
द्यावा संतोष रसिकांच्या मनास,
रमणींच्या मस्तकीं आम्हीच खुलावे,
प्रभूच्या मुकुटी आम्हांला गुंफावे,
हार ते नेत्यांचे आम्हीच भूषवावे,
पायीं चुरगळुनी आम्हां न टाकावे,
क्षणभंगुर आयू सार्थकी लागावे,
मनिषा हीच एक, सर्वां सुख द्यावे ॥"



# लोकमान्यांच्या स्मृतीस

श्रद्धांजली अर्पुया लोकमान्यां,
जये देशसेवा व्रता घेतले.
जिकोनी साऱ्या जनमानसांसी,
तयां देशकार्यी तुवां योजिले.
करण्यास देशोन्नती तू उदारा,
अगा शूरवीरा किती कष्टला !
' स्वराज्य हा आमुचा जन्मसिद्ध
असे हक्क ' हा मंत्र जनते दिला ॥१॥
कारागृही वास केलास तू,
तुझ्या ज्ञानतेजें अरी कापले.
निर्मूनि ' गीतारहस्य ' सुग्रंथा
जनाच्या हृदीं स्थान तू घेतले.
कवि वर्णिती थोर चारित्र्य तुझे,
स्मृतीला तुझ्या आदरे वंदिती.
मूर्ती तुझी स्थापुनी अंतरंगी,
तुला भक्तिभावे नमस्कारिती ॥ २ ॥
पाश्चात्य विद्वान् तुला गौरवीती,
असा थोर सत्पुत्र तू हिंदचा.
महाराष्ट्री जन्मोनी या भारताला
तुवा दाविले आपुल्या दिव्य तेजा.
बलवंत तू ' केसरी ' हिंदभूचा,
गेलास सोडोनि दुर्भाग्य हे.
इतिहास लिहिण्या सुवर्णाक्षरांनी,
पुन्हा भारती जन्म घे, जन्म घे ॥ ३ ॥

# हीच प्रतिज्ञा आमुची आज !

लोकमान्य टिळक स्मृतिदिनानिमित्त

**विद्यार्थ्यांचे समूहगीत**

आज असू जरी आम्ही लहान
कीर्ती पसरवू जगी महान ॥ ध्रु ॥

तुजसम होण्या आम्ही झटू,
तुझिया ध्येया आम्ही गाठू ।
चरित्र तव ते आम्हापुढे,
पुन्हा पुन्हा हो उभे खडे ॥ १ ॥

लोकमान्य तुज म्हणताती
अमर जहाली तव कीर्ती ।
कधी न विसरू आम्ही तुला
सेवू आपुल्या देशाला ॥ २ ॥

बाळ टिळक तू राष्ट्राचा
तिलक भरतभू ललाटीचा ।
देशा चढवू सुकीर्ति-साज
हीच प्रतिज्ञा आमुची आज ॥ ३ ॥



# देशबंधू चित्तरंजन दास यांच्या स्मृतीस

[ भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीकरता वंगभूमींत असंख्य देश-भक्त, क्रांति-कारक यांनी प्राणार्पण केले. त्यांत देशबंधू चित्तरंजन दास हे अग्रगण्य होते, त्यांना ' बंगालचा वाघ ' म्हणत. त्यांच्या पवित्र स्मृतीस हीं वंदना— ]

या भरतभूमीवरती, आघात थोर झाला,
हा कंठमणि तियेचा, हा हाय ! गळुनि पडला ॥ धृ ॥

जनचित्त रंजवूनी नावास सार्थ केले.
पाहूनी कार्य ज्याचे, शाबास, हिंद बोले ॥
रिपु कापले थरारा, ऐकून गर्जनेला.
त्या घातले तुरूंगी, परी ' वाघ ' नाही भ्याला ! ॥

स्वातंत्र्य भारताचे, मनिषा मनात होती,
चित्तात प्रेरणा ही करणे महान क्रांती ॥
स्वातंत्र्य घोषणेने, समरास सज्ज झाला,
लढता पराक्रमाने, बंगाली वाघ पडला ॥
या भरतभूमीवरती, आघात घोर झाला
हा कंठमणि तियेचा, हा हाय गळुनि पडला ॥



# भारतीय नरनारी रत्ने

[ गुरुदेव टागोरांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांची स्मृती झाली व त्यांच्या बरोबरच असंख्य भारतीय रत्ने नजरेसमोर आली. त्यांची ही रत्नमाला सहजच गुंफिली गेली–]

नररत्नांची खाण असे ही आमुच्या या भारती
किती रत्ने सापडली ती, त्यांची ना गणती ।
हिरे, माणके, आणि मौक्तिके, पाचू हिरकण्यांचा,
या रत्नांचा मुकुट मस्तकी भारतमातेच्या ।
जिजा माउली, तशीच लक्ष्मी झाशीची राणी
कुमारी कृष्णा, दुर्गावती त्या गेल्या चमकोनी ।
राणी पद्मिनी, तशाच किती रजपूत वीर रमणी
वंग कवयित्री दत्त तरुलता, चन्नमा राणी ।
अशा हिरकण्या चमकल्या भारती आपुल्या तेजाने,
जरी लोपल्या तरी तळपती निज कर्तृत्वाने ।
श्री शिवराया, नंतरचे ते बाल, लाल, पाल,
वल्लभ, विठ्ठल, तसा महात्मा तो मोहनलाल ।
मोतीलाल, जवाहरलाल, लालबहादुर,
सावरकर अन् सुभाषबाबू जगात मशहूर ।
रामतीर्थ अन् विवेकानंद अशी नररत्ने थोर
तसे महर्षी प्रकाशती या भारतभूमीवर ।
क्रांतीकारक, साहित्यिक, कवि, भारती मान्यवर
या सर्वांतची समावलेले रवींद्र टागोर ।
वाङमय-प्रांगणी विविध कृतींनी देशा दिपवियले,
देशप्रीतीचे, स्वातंत्र्याचे बीज रोवियेले ।
गुरुदेव तया म्हणती सार्थ ते कृती त्यांची थोर
आज स्मृतिदिनी आपण त्यांचा करु जयजयकार !

# परीक्षा आणि पाखरे !

(वर्गात मुली पेपर लिहीत आहेत, बाहेरच बागेतील झाडांवर पाखरांचा चिवचिवाट चालू आहे, हे दृश्य पाहून—)

वर्गात बालिका लिहिती प्रश्नांची उत्तरे,
खिडकीच्या बाहेर चिवचिवती पाखरे ।।
किलबिल पाखरांची जराही थांबेना,
कसे सोडवावे प्रश्न हे सुचेना ॥
पक्षी चोचीमध्ये अन्न ते घेताती
ज्ञानाची शिदोरी बालिका बांधिती ॥
पक्षी पिलांसाठी खाद्य जमविती
जीवनास्तव मुली ज्ञान संपादिती ॥
ज्ञान पारखाया परीक्षा असणार,
पाखरांना याची कल्पना नसणार ॥
कलकलाट करिती पाखरे ही पाहा,
मुलींनी पेपर लिहावा कसा हा ! ॥
कशाचा झाला या पाखरा आनंद
सुचत ना उत्तरे झाली गती मंद ! ।।
विद्यार्थिनी आत्ता मोकळ्या असत्या,
पक्षी-कूजनाला ऐकाया धावत्या ॥
परी ते ना शक्य आज या वेळेत,
म्हणून बालिका उत्तरे लिहितात ! ॥
कूजन पक्ष्यांचे, लेखन मुलींचे
श्रेष्ठ कोण ? उत्तर काय निसर्गाचे ? ॥
विचारतरंग मनात तरंगती
उत्तरे लिहूनी मुली उठताती ॥
पाखरे आपुल्या घरट्यांत जाती
घरांच्या ओढीने विद्यार्थिनी पळती !॥

# प्रियदर्शिनी इंदिरेस



नाम तुझे इंदिरा खरी तू आमुची प्रियदर्शिनी.
रणांगणावरी शूर सैनिका होशी वरदायिनी ।

अन्यायाची चीड येऊनी बनसी रणरागिणी
शत्रुसैन्या तूच भासशी महिषासुरमर्दिनी ।

मनी मानसी शांत राहुनी संयमही पाळुनी,
कितीक अन्याया साहुनिया विचार करिसी मनी ।

भारतीय संस्कृतीस जपसी, न्यायपथी चालशी
दिव्य वाणीने विरोधकांसी मुकाबला करिशी ।

जी राष्ट्रे तुजपुढती ठाकती वरवर जी लोभस,
अन्यायाची चीड येऊनी खळबळले मानस ।

अंतरंगी शिरून त्यांच्या घेसी ठाव कृतिचा,
सफला जाहल दौरा तव अनू साध्य हेतु मनिचा ।

परतून आलीस जणू भासलीस शक्तीदेवतेपरी
जवान मर्दा धीर द्यावया धैर्यशालिनी खरी ।


रणांगणावर शूर सैनिका शब्द तुझे आधार
लढतील किंवा मरतील तरीही घेती ना माघार।

सुजलां, सुफलां "बांगला" असे भारतास शेजार,
हतबल झाला, भारतभूमी दे त्याला सहकार

वंगकवि टागोर तयांच्या पवित्र या देशा
तूच आदरे संरक्षिसी या महान् वंगदेशा।

गुरुदेवांच्या कृपाप्रसादे विजय पावलीस
महाकवीच्या राष्ट्रगीतांची शान राखलीस

" जनगणमन " आणि "आमार सोनार बांगला" ही गीतें,
अमर खरी जाहली याची ही स्मृती आज होते।



# काही भक्ती गीते

(कै. गोदावरी राहाळकर या अलिबागेतील एका महिला मंडळाच्या सदस्य होत्या. शाळा, गृहकृत्ये आणि प्रकृती संभाळून त्या मंडळाच्या कार्यात यथाशक्ती भाग घेत. मंडळात धार्मिक कार्यक्रमही होत. त्या निमित्त म्हणण्यासाठी काही पद्यरचनाही त्यांनी केली. त्यांतील काही पुढे दिली आहेत.)

## दृष्ट



अंबे कालिबिके तुझी ग दृष्ट आम्ही काढतो
(षड्रीपूंच्या) काम-क्रोधाच्या मीठ-मोहऱ्या ओवाळुनि टाकितो ।।धृ।।

भावभक्तीचे हळदीकुंकू भाळी तुझ्या लावितो,
अंबे, भाळी तुझ्या लावितो ।

सद्भावाचे काजळ आम्ही नयनीं तव घालितो,
सद्बुद्धीचे नवरत्नांचे अलंकार अर्पितो ।।

त्रिगुणांचे नव वस्त्र नेसवुनी तुला आम्ही सजवितो,
अंबे, तुला आम्ही सजवितो,

भजनरंगी रंगून तुजला गीत सुमें वाहतो,
भक्ती-गीत सु-मन मालिका कंठी तुझ्या ठेवितो ।।

तव पूजेस्तव उत्सुक महिला, येथे आम्ही जमतो,
अंबे, येथे आम्ही जमतो ।

अनेक असुनी एक दिलाने तव भजनी रंगतो.
ताल सुरांचा मुगुट मस्तकावरी तुझ्या शोभतो ।।

प्रेमभराने तुजवरुनी आम्ही लिंबलोण उतरितो,
अंबे, लिंबलोण उतरितो ।

प्रार्थुनि तुजला जगदंबे तव आशीर्वाद मागतो,
दृष्टी कृपेची सदैव लाभो हेच मनी वांछितो ।।

अंबे काळिंबिके तुझी गे दृष्ट आम्ही काढितो,
(षड्रीपूंच्या) काम-क्रोधाच्या मीठ-मोहऱ्या ओवाळुनि टाकितो ।।

# भगवंत राजी



भक्ताचिये काजी, भगवंत राजी
भाव भक्ती माझी, त्याचे ठाई ॥ धृ ॥

गोरोबाचे संगे माती तुडविली
तुकोबाची अभंग गाथा तारियेली
प्रभु दाम मोजी, दामाजीचे काजी ॥ १ ॥

भेटीसाठी येती संत नी महंत,
चालुनिया गेली ज्ञानेशाची भित,
नामयाची खाई भाकरही ताजी ॥ २ ॥

पुंडलिकाचा त्या हट्ट पुरविला
पंढरीचा राया विटेवरी थांबला,
अनंत असे त्या अनंताची मर्जी ॥ ३ ॥

जलाची, स्थलांची, फुला-पाखरांची,
चिंता तयाला या साऱ्याच विश्वाची,
कधी स्वप्नामाजी ज्ञानामृत पाजी ॥ ४ ॥

# दत्ताचा पाळणा



बाळा जो जो रे, श्रीदत्ता, अत्रि-अनुसुया सुता ॥ धृ ॥

तुझा जन्म जगती, अद्‌भूत, वर्णिती साधुसंत,
ब्रम्हा, विष्णु आणि महेश, त्रिगुणांचे जे ईश,
नांदतसा प्रेमे, एकत्र, गुण गातातो भक्त,
आनंदित झाले, मनी सगळे, सत्कर्मी रत झाले ॥ १ ॥

पतिव्रता पत्नी, देवी तिन्ही, गाजती ज्या त्रिभुवनी
गर्व मनी धरिती, सावित्री, लक्ष्मी आणि पार्वती
आम्ही पवित्र त्या, सुचरिता, देवलोकी मान्यता
आम्हीच मिळविली, गर्व मनी, जाणती नारदमुनी ॥ २ ॥

गर्वहरण करण्या, योजियले, अनुसूयेचे आगळे
सतीत्व वर्णियले. परिसुनिया, संतप्त सुरांगना !
धाडियले पतींना, विनवूनी, अत्री-मुनी आश्रमी,
त्रैमूर्ती तुमच्या भूवरती, सत्त्व हराया येती ॥ ३ ॥

सत्त्वपरीक्षेला, देव आले, रूपे अतिथी बनले,
विवस्त्र होऊनिया, दे भिक्षा, हीच अमुची अपेक्षा
देवे सांगितले. परि सत्त्वबळे, बनली तीनही बाळे !
तीच ही त्रयमूर्ती, गाजविती, अनुसूयेची कीर्ती ॥ ४ ॥

दत्तात्रय नामे, जन्मुनिया, भक्ता उद्धाराया,
अघटित करणी ती करुनिया, दावित अद्‌भुत माया.
आपुल्या भार्यांना, शिकवियला धडा हरुनि गर्वाला
अत्रि–अनसुयेला, गौरविले, बाळ तयांचे झाले ॥ ५ ॥

तो तू दत्तगुरु, मनी वसे, भक्तांना तारितसे,
त्रिगुणात्मक ऐशी, तव मूर्ती, कांति वदनावरती,
जटा मस्तकावरी विराजती, पायी खडावा शोभती.
तुझे सगुण ध्यान, मम हृदयी, गाते तुज अंगाई ॥ ६ ॥

REFBK-0021118
REFBK-0021118

# विवाह शुभ प्रसंगीचा अहेर

(काही नातलग, मैत्रिणी, माजी विद्यार्थिनी यांच्या विवाहप्रसंगी मंगलाष्टके, पद्यमय अहेर वगैरे बरीच रचना प्रसंगानुरूप झाली. त्यांतील एक नमुना (पद्यमय अहेराचा) पुढे दिला आहे.)

विश्वाचा निर्माता । पालक सर्वांचा
मानसी नित्याचा । असो तुझ्या

पति हा स्त्रियांचा । श्रेष्ठ अलंकार
सेवी निरंतर । प्रेमे तया.

सासू-सासऱ्याशी । ठेवावे प्रसन्न
मानुनिया त्यांस । माता पिता.

आप्तइष्टजनां । भाऊ बहिणी मानी
सुमाता होऊनी । शोभो कुल.

आपुल्या गृहीच्या । दास-आश्रितांची
चिंता सकलांची । नित्य वाही.

तुज सहचर । शील-रूप-युत
गुणी बुद्धीमंत । लाभलासे.

पती-पत्नी दोघे । चक्रे संसाराची
उभय कुलांची । भूषणे व्हा.

सदा शुभ करो । ईश मंगलकारी
नांदा सौख्यभरी । चिरकाल.

ग्रंथ संग्रहालय
२२८७
२११९८

कै. श्रीमती गोदावरी राहाळकर यांचे बाल कथा साहित्य—

प्रकाशित :

१) शेवंतीचे फूल.

२) कापसाची किमया.

३) जादूची कोंबडी.

४) कुठे असतो देव ?

(पुण्याच्या 'अरगडे कुलकर्णी' प्रकाशन संस्थेतर्फे प्रकाशित)

आगामी :

१) नीलाश्व (निळाघोडा).

२) कबरीची करामत.

३) सवा लाखाची गोष्ट.

४) अखेर दैव उजळले !